- प्रेस नोट - दिनांक २१/०३/२०२२.

| | अॅन्टी करप्शन ब्युरो सिंधुदुर्ग |
|---|---|
| आरोपी लोकसेवकाचे नाव व कार्यालय | विठ्ठल वैजीनाथ कंठाळे, वय-३४ वर्षे,<br>तलाठी सजा वायंगणी ता.मालवण जि.सिंधुदुर्ग, वर्ग-३ |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | २५,०००/-रूपये |
| थोडक्यात माहिती | यातील तक्रारदार हे त्यांचे तोंडवळी गावातील मित्रांसमवेत तोंडवळी गावातील खाडीकिनारी वाळू उपसा करून वाळूचा व्यवसाय करतात. श्री.विठ्ठल कंठाळे, तलाठी सजा तोंडवळी हे तक्रारदार व त्यांचे मित्रांचे वाळू उपसा ठिकाणी रॅम्पवर येवून तसेच वाळुच्या गाडया थांबसुन दंड न करण्यासाठी पेशाची मागणी करून त्यांना नाहक त्रास देतात तसेच मा.जिल्हाधिकारी सिंधुदुर्ग यांचे कार्यालयाकडून वाळू उपसा टेंडर मंजुर झालेले असुन अदयाप त्याचा पास मिळालेला नसल्याने पंधरा ते वीस दिवस होतील तेव्हापासुन त्यांनी वाळू उपसाचे काम बंद ठेवलेले असुनसुध्दा तोंडवळी गावचे तलाठी श्री.कंठाळे हे तक्रारदार यांना फोन करून ५०,०००/- रूपये घेवून ये असे सांगितल्याने तक्रारदार यांनी लोकसेवक श्री.कंठाळे यांची अॅन्टी करप्शन ब्युरो सिंधुदुर्ग यांचेकडे दिनांक ०५/०३/२०२२ रोजी लेखी तक्रार दिली होती.<br>तक्रारदार यांचे तक्रारीचे अनुषंगाने दिनांक ०५/०३/२०२२ रोजी सर्व कायदेशीर बाबींची पुर्तता करून लाचेच्या मागणीची पडताळणी केली असता लोकसेवक श्री.कंठाळे, तलाठी सजा तोंडवळी यांनी तक्रारदार यांचेकडे त्यांच्या व मित्रांच्या वाळू वाहतुकीच्या गाडयांवर कारवाई न करता सहकार्य करण्यासाठी २५,०००/- रूपये लाचेची मागणी केलेली आहे म्हणून दिनांक २१/०३/२०२२ रोजी लाकसेवक श्री. विठ्ठल वैजीनाथ कंठाळे तलाठी सजा, वायंगणी यांचेवर भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम सन १९८८ चे कलम ७ अन्वये पोलीस ठाणे आचरा येथे गुन्हा दाखल करणेत आलेला असुन सदर गुन्हयाकामी त्यांना अटक करण्यात आली आहे.<br>वरील कारवाई श्री.दिपक कांबळे, पोलीस उपअधीक्षक, असेबी सिंधुदुर्ग यांचेकडून करण्यात आलेली आहे. |

अॅन्टी करप्शन ब्युरो, सिंधुदुर्ग विभागातर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणा-या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास अॅन्टी करप्शन ब्युरो सिंधुदुर्ग विभागाशी संपर्क साधावा.

**संपर्क :- अॅन्टी करप्शन ब्युरो सिंधुदुर्ग यांचे कार्यालय, कुडाळ,ता.कुडाळ**

**टोल फ्री नंबर:-१०६४,**

**दुरध्वनी क.०२३६२-२२२२८९**

(दिपक कांबळे)
पोलीस उपअधीक्षक
अॅन्टी करप्शन ब्युरो सिंधुदुर्ग